# द हाऊंड ऑफ बास्करव्हिल

लेखक : आर्थर कॉनन डायल

अनुवाद : विवेक जोशी

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**द हाऊंड ऑफ बास्करव्हिल : विवेक जोशी**

© **प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मे, २०१२

**किंमत**
रुपये १८०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# द हाऊंड ऑफ बास्करव्हिल

**ऋणनिर्देश**

सर ऑर्थर कॉनन डायल
कै. भालबा केळकर
कै. गजानन क्षीरसागर
श्री. ह. आ. भावे
श्री. आनंद अंतरकर

# अनुक्रमणिका


- शेरलॉक होम्स ............. ९
- बास्करव्हिलचा शाप ............. १७
- गूढ समस्या ............. २७
- सर हेन्री बास्करव्हिल ............. ३८
- तीन कच्चे धागे ............. ५१
- बास्करव्हिल हॉल ............. ६३
- स्टेपलटन भावंडांची भेट ............. ७४
- डॉ. वॅटसनचा पहिला अहवाल ............. ९०
- डॉ. वॅटसनचा दुसरा अहवाल ............. ९८
- वॅटसनच्या डायरीतील उतारे ............. ११७
- टेकाडावरील माणूस ............. १२८
- माळावरचं मरण ............. १४२
- फास आवळले ............. १५७
- हाऊंड दिसला ............. १६८
- दहशतीचा अंत ............. १७४
- मागे वळून बघता ............. १८२


✦✦✦

# शेरलॉक होम्स

सारी रात्र ब्रेकफास्टच्या टेबलजवळ बसून घालवली नसेल तर सकाळी शेरलॉक होम्सला येण्यास उशीर हा ठरलेलाच असे. मी भट्टीजवळच्या गालिच्यावर उभा होतो. खाली वाकून काल रात्री आलेल्या पाहुण्याची विसरून राहिलेली काठी उचलून तिचं निरीक्षण करू लागलो. तो एक लाकडी कलाकृतीचा उत्कृष्ट नमुना होता. अशा प्रकारची मूठ असणारी काठी 'पेनांग लॉयर' म्हणून ओळखली जाई. मुठीच्या खालच्या अंगाला एक चांदीची पट्टी ठोकलेली होती आणि तिच्यावर 'जेम्स मॉर्टिमर यांना त्यांच्या सी. सी. एच. मधील मित्रांकडून,' अशी अक्षरं कोरली होती आणि खाली '1884' असं साल नमूद केलं होतं. साधारणपणे जुन्या पिढीतील खानदानी माणसं अशी काठी वापरत. तिच्यामुळे संरक्षण आणि रुबाब असे दोन्ही हेतू साध्य होत.

''बोल वॅटसन, त्या काठीवरून तुझ्या काय लक्षात आलं ?''

होम्स तर माझ्याकडे पाठ करून बसला होता आणि मी काय करतो आहे ह्याचा त्याला सुगावाही लागू दिला नव्हता.

''मी काय करतो आहे हे तुला कसं समजलं ? बहुतेक तुझ्या डोक्याला पाठीमागेही डोळे असावेत.''

''अरे बाबा, माझ्या पुढ्यात चकचकीत पॉलिश केलेलं हे चांदीचं कॉफीचं भांडं आहे की नाही ?'' होम्स म्हणाला. ''पण वॅटसन, आपल्या पाहुण्याच्या काठीवरून काय तर्क केलास ते सांगशील की नाही ? दुर्दैवानं तो तर गेलाच आहे आणि परत येण्याची शक्यताही नाहीच तेव्हा आपल्या दृष्टीनं ही चुकून राहिलेली काठीच महत्त्वाची ! आता तिच्यावरून त्या पाहुण्याविषयी तुझं काय मत आहे ते सांग पाहू !''

''मला वाटतं,'' मी त्याच्याच पद्धतीचा अवलंब करीत म्हणालो, ''हे डॉ. मॉर्टिमर वयस्कर, यशस्वी वैद्यकीय व्यावसायिक असावेत. त्यांना अशी उत्तम वस्तू भेट म्हणून मिळते ह्यावरून ते चांगले लोकप्रियही असणार !''

''छान !'' होम्स म्हणाला, ''उत्तम !''

''ते ग्रामीण विभागात व्यवसाय करीत असण्याची शक्यता जास्त आहे. म्हणजे त्यांना बरंच चालावं लागत असणार !''

''कशावरून ?''

''ह्या काठीवरून ! ती मूळची कितीही चांगली असली तरी तिच्या अवतारावरून ती ग्रामीण भागातील व्यावसायिकानं वापरलेली स्पष्ट दिसते. तिचं शिवळ ✲ काठीच्या खालच्या टोकाला बसवलेलं धातूचं कडं किती झिजलं आहे ते बघ ! त्यावरून तिचा चालताना भरपूर वापर केलेला दिसतो.''

''अगदी बरोबर !''

''आता हे सी. सी. एच. मधील मित्रांकडून हे शब्द बघ ! मला ते शिकारीविषयी असावं असं वाटतं. त्यांनी स्थानिक व्यावसायिकांना शस्त्रक्रियेच्या बाबतीत मोठी मदत केली असावी. त्याबद्दल कृतज्ञता म्हणून त्यांना ही भेट मिळाली असावी.''

''खरंच वॅटसन, तू उत्कृष्ट काम केलंस !'' होम्स आपली खुर्ची मागे ढकलून सिगरेट पेटवीत म्हणाला, ''मी मनापासून सांगतो की मला माझ्या छोट्या यशाचं श्रेय देताना तू स्वत:च्या कौशल्याला फार कमी लेखतो आहेस. तू मोठा दीपस्तंभ नसशील पण लोकांना पुरेसा प्रकाश देण्याचं सामर्थ्य तुझ्याजवळ निश्चितच आहे. बरीच सर्वसामान्य वाटणारी माणसं असंच महत्त्वाचं काय करीत असतात – तुझे माझ्यावर खरोखरच फार मोठे उपकार आहेत दोस्त !''

आत्तापर्यंत तो एवढं मोकळेपणानं कधीही बोलला नव्हता. त्याच्या कर्तृत्वाचं मला नेहमीच कौतुक वाटत असे, त्याच्या कार्यपद्धतीला मी प्रसिद्धी देई पण ह्या सर्व गोष्टींकडे तो विलक्षण कोरडेपणाने बघे त्याची मला चीड येई ! आत्ता मात्र आपल्या बोलण्यानं त्यानं ह्या सर्व गोष्टींची भरपाई केली होती. त्याच्या कार्यपद्धतीत थोडंफार पारंगत झाल्यावर मला स्वत:चा अभिमान वाटला आणि त्यानं त्यावर शिक्कामोर्तब केला. त्यानं माझ्या हातून ती काठी घेतली आणि काही मिनिटं तिचं निरीक्षण केलं.

✲ काठीच्या खालच्या टोकाला बसवलेलं धातूचं कडं.